लोकमत

अशोक बागुल : विद्यार्थ्यांना दिले जागरूकतेचे धडे

# प्रत्येकाने सायबर सुरक्षेबाबत जागरूक असायलाच हवे

लोकमत न्यूज नेटवर्क

**भंडारा :** सायबर सुरक्षा ही काळाची गरज असून, प्रत्येकाने सायबर सुरक्षेबाबत जागरूक असायला हवे, असे प्रतिपादन भंडाराचे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. अशोक बागुल यांनी केले. सायबर सेल भंडारा आणि क्विक हील फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने येथील जे. एम. पटेल महाविद्यालयात सायबर सुरक्षा जागरूकता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

कार्यशाळेचे आयोजन संगणकशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता कक्षाने केले. डॉ. बागुल यांनी विद्यार्थ्यांना सायबर विश्वात कसे वागावे याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी त्यांच्या पोलिस कारकिर्दीचा वास्तविक जीवनातील अनुभव शेअर केला आणि सायबर पोलिस कसे काम करतात तसेच सायबर गुन्ह्यांचा तपास कसा केला जातो, याबाबत विस्तृत माहिती दिली.



मार्गदर्शन करताना डॉ.अशोक बागुल. उपस्थित प्राचार्य ढोमणे व अन्य.

प्रास्ताविक करताना फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुगंधा दाणी यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व आणि तरुण विद्यार्थी आणि सामान्य लोकांमध्ये सायबर जागरूकता पसरवून विद्यार्थी कसा फरक निर्माण करू शकतात, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दाणी यांनी क्विक हील फाउंडेशनच्या "सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा" मिशनचे अनावरण केले.

## सुरक्षा महत्त्वाची

- कार्यशाळेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विकास ढोमणे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा किती महत्त्वाची आहे याविषयी मार्गदर्शन केले.
- विद्यार्थी जीवनात विद्यार्थ्यांनी इंटरनेट, मोबाइल आणि इतर उपकरणांचा नैतिकतेने आणि विवेकबुद्धीने कसा वापर करावा याविषयीच्या विविध तथ्यांवरही त्यांनी यावेळी प्रकाश टाकला.

सायबर सेलचे पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी, विद्यार्थ्यांना सायबर विश्वात सुरक्षित कसे राहायचे याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी सायबर फसवणूक, सेक्सटोरशन आणि अनेक सायबर गुन्ह्यांची उदाहरणे दिली होती. वैद्यकीय क्षेत्रातही सायबर गुन्हे कसे घडतात याची माहिती दिली. २४ तासांच्या आत तक्रार केल्यास सायबर गुन्ह्यांमुळे होणारे नुकसान कमी होण्यास मदत होऊ शकते, असे यांनी सांगितले.

संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रवीण घोसेकर यांनी आभार मानले.

यावेळी फाउंडेशनचे विदर्भ समन्वयक नागेश तलारी, धनंजय जाचक, सायबर सेल दिनेंद्र आंबेदरे, गौतम राऊत उपस्थित होते. कार्यशाळेसाठी अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक डॉ. कार्तिक पणिकर यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यशाळेत डॉ. श्रीधर शर्मा, डॉ. सबाह नसीम, प्रियांका शर्मा, पलाश फेंडेवार, डॉ. विनी ढोमणे उपस्थित होते.